




दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : २७७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.१९ मे २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## महाराष्ट्रात पुन्हा निवडणुकांचे पडघम; विधानपरिषदेच्या १६ जागांसाठी निवडणूक

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१८, मुंबई** :महाराष्ट्र विधानपरिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकांची घोषणा करण्यात आली असून १६ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या सर्व १६ जागा या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारसंघातील असून या जागांसाठी १८ जून रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची मुदत २५ मे ते १ जून असणार आहे, तर अर्जांची छानणी २ जून रोजी होणार आहे. या निवडणुकीसाठी २२ जून रोजी मतमोजणी होणार आहे. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबल्याने या मतदारांतून होणाऱ्या विधानपरिषदेच्या निवडणुकाही लांबल्या होत्या. मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका काही दिवसांपूर्वी पार पडल्याने विधानपरिषदेच्या या १६ जागांसाठीच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे.

**कोणकोणत्या मतदारसंघांसाठी होणार निवडणूक?**

सोलापूर, अहिल्यानगर, ठाणे, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, नाशिक, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, अमरावती, धाराशिव-लातूर-बीड, परभणी-हिंगोली आणि छत्रपती संभाजीनगर-जालना

**दहा विधानपरिषद सदस्यांना शपथ**

काही दिवसांपूर्वीच विधानसभा सदस्यांच्या मतदानावर होणाऱ्या विधानपरिषदेच्या ९ जागांवरील निवडणूक पार पडली. विधान परिषदेच्या द्विवार्षिक निवडणुकीत बिनविरोध निवड झालेले नऊ आणि पोटनिवडणुकीत विजयी झालेल्या एक अशा दहा सदस्यांचा शपथविधी गुरुवारी सकाळी विधान भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात पार पडला. परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी या सदस्यांना शपथ दिली. या वेळी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार उपस्थित होते.




बिनविरोध निवड झालेल्या सदस्यांमध्ये भाजपचे प्रमोद जठार, माधवी नाईक, सुनील कर्जतकर, विवेक कोल्हे, संजय भेंडे. शिवसेनेच्या नीलम गोऱ्हे, बच्चू कडू, शिवसेना उबाठा पक्षाचे अंबादास दानवे आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून झिशान सिद्दीकींचा समावेश आहे. प्रज्ञा सातव यांनी काँग्रेस पक्षातून राजीनामा दिल्यानंतर रिक्त जागेसाठी पोटनिवडणूक घेतली होती. भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर सातव यांनाच ती जागा देण्यात आली.

## सत्ताधारी शिवसेना आणि भाजप विरोधात काँग्रेसची निदर्शने



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१८, ठाणे :** महापालिकेच्या प्रत्येक सर्वसाधारण सभेत सत्ताधारी शिवसेना आणि भाजप यांच्यात जुंपली आहे. मात्र यामुळे विकासकामे खोळंबली असून जनता यात भरडली जात आहे. महासभेत सत्ताधाऱ्यांनी केलेल्या गोंधळाचा निषेध करण्यासाठी आज ठाणे काँग्रेसच्या वतीने पालिका मुख्यालयासमोर शहर अध्यक्ष विक्रांत चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली निदर्शने करण्यात आली.

मागील आठवड्यात झालेल्या ठाणे महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत सत्ताधारी शिवसेना आणि भाजप यांच्यात चकमक उडून महासभा आटोपण्यात आली. तब्बल तीन वर्षांनी ठाणे महापालिकेचे सभागृह अस्तित्वात आले आहे. प्रशासकीय कारकिर्दीत सर्वसामान्य ठाणेकरांची कामे खोळंबली होती असा लोकप्रतिनिधींचा आरोप होता. मात्र आता सभागृह स्थापन झाल्यानंतर लोकांची कामे करण्याचे सोडून, प्रश्नांवर चर्चा करायचे सोडून शिवसेना व भाजपा हे भांडण्याचे नाटक करत पाच मिनिटात विषय मंजूर करत असल्याची टिका विक्रांत चव्हाण यांनी केली.

सत्ताधाऱ्यांच्या या खेळी मुळे नविन नगरसेवकांना चर्चा करता येत नाही. आपल्या प्रभागातील विषय मांडता येत नाही. आज स्थायी समिती, विशेष समिती, प्रभाग समित्या अजून स्थापन झालेल्या नाहीत. त्यामुळे पुन्हा अशाच प्रकारे भोंगळ कारभार सुरु असून विकासाला खीळ बसली आहे. याच कारणांमुळे आज काँग्रेसने हिंदी चिनी भाई - भाई, भाजपा-शिवसेना मिलके खाई अशा घोषणा देत आंदोलन केल्याची माहिती विक्रांत चव्हाण यांनी दिली.

आंदोलनानंतर विक्रांत चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने पालिका आयुक्त आणि अतिरिक्त आयुक्त रोडे यांना निवेदन दिले. सभागृहात घाईघाईने मंजूर केलेल्या विषयांमध्ये त्रुटी असल्याने सखोल अभ्यास करुन पुन्हा ते विषय महासभेत आणावे किंवा ते विखंडीत करण्यासाठी शासनाकडे पाठवावे, अशी मागणी निवेदनात केल्याची माहिती विक्रांत चव्हाण यांनी दिली. शिष्टमंडळात भालचंद्र महाडिक, निशिकांत कोळी, शैलेश घरत, उमेश कांबळे, वैशाली भोसले, स्वनिल कोळी, सर्व ब्लॉक अध्यक्ष आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## सरकार विरोधात ट्रॅक्टर आंदोलन!

## लासलगावात आमदार रोहित पवारांच्या नेतृत्वाखाली 'शेतकरी एल्गार'

### कांद्याला २४ रुपये भाव देण्याची मागणी; २६ मे रोजी चांदवडला महामार्ग रोखण्याचा इशारा

**-: आंदोलनातील प्रमुख मागण्या :-**

- कांद्याला किमान २२ ते २४ रुपये प्रतिकिलो हमीभाव मिळावा.
- नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रति क्विंटल किमान १५०० रुपये अनुदान द्यावे.
- कांदा निर्यात धोरण स्थिर ठेवून निर्यातीस प्रोत्साहन द्यावे.
- नाफेडमार्फत मोठ्या प्रमाणात खरेदी करून बाजारभाव स्थिर करावा.
- शासनाने थेट बाजार समित्यांमधून कांदा खरेदी करावी.

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१८, विंचूर (नाशिक) :** राज्यात कांद्याचे दर सातत्याने घसरत असल्याने संतप्त झालेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी आज आशियातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेल्या लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत 'शेतकरी एल्गार' पुकारला. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली हजारो शेतकऱ्यांनी गळ्यात कांद्याच्या माळा, कमरेला केळीची पाने आणि हातात सरकारविरोधी फलक घेऊन जोरदार घोषणाबाजी केली. या आंदोलनाने संपूर्ण बाजार समिती परिसर दणाणून सोडला होता.

आंदोलनादरम्यान आमदार रोहित पवार यांनी स्वतः कांद्याने भरलेला ट्रॅक्टर चालवत बाजार समितीच्या आवारात प्रवेश केला. त्यांच्या या प्रतीकात्मक आंदोलनाने उपस्थित शेतकऱ्यांमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला.

**निवडणुकीत २४ रुपये, मग आता १२ रुपये का? रोहित पवारांचा थेट सवाल**

सभेला संबोधित करताना आमदार रोहित पवार यांनी सरकारच्या कांदा धोरणावर सडकून टीका केली. ते म्हणाले, शेतकऱ्याला कांदा पिकवण्यासाठी प्रतिकिलो १८ ते २० रुपये खर्च येतो, मात्र बाजारात केवळ २ ते ३ रुपये भाव मिळत आहे. अनेक ठिकाणी तर बोलीही लागत नाही. ही परिस्थिती शेतकऱ्यांसाठी वेदनादायी आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या १२ रुपये ३५ पैसे दराने २ लाख टन कांदा खरेदीच्या निर्णयावर आक्षेप घेत ते म्हणाले, निवडणुकीपूर्वी सरकार २४ रुपये भाव देण्याच्या घोषणा करते आणि निवडणुकीनंतर १२ रुपये सांगते. हे शेतकऱ्यांवर उपकार आहेत का? राज्यात रब्बी हंगामात जवळपास ७० लाख टन कांदा उत्पादन होते. सरकार जर फक्त २ लाख टन खरेदी करणार असेल, तर उर्वरित ६८ लाख टन कांद्याचं काय? अशा तुटपुंज्या खरेदीने बाजारभाव सुधारणार नाही.



**नाफेडच्या अनुदानात अपहार; चौकशीची मागणी**

मागील वेळी सरकारने जाहीर केलेल्या २०० रुपये अनुदानापैकी केवळ ५० रुपये शेतकऱ्यांना मिळाले असून, उर्वरित रकमेचा अपहार झाल्याचा गंभीर आरोप रोहित पवारांनी केला व या प्रकरणाच्या चौकशीची मागणी केली. तसेच, धारणगाव खडक येथील शेतकरी विश्वनाथ उशीर यांच्या आत्महत्येचा उल्लेख करत, आम्ही तुमच्या पाठीशी आहोत, शेतकऱ्यांनी टोकाचे पाऊल उचलू नये, असे भावनिक आवाहन त्यांनी केले.

**२६ मे रोजी चांदवडला रास्ता रोको**

या आंदोलनानंतरही सरकारने तातडीने योग्य निर्णय घेतला नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा पवारांनी दिला. याचाच पुढचा भाग म्हणून २६ मे रोजी चांदवड येथे मुंबई - आग्रा महामार्गावर 'रास्ता रोको' करण्यात येईल, अशी घोषणा यावेळी करण्यात आली.

**दिग्गजांची उपस्थिती :**

या 'शेतकरी एल्गार' आंदोलनात खासदार निलेश लंके, खासदार भास्करराव भगरे, माणिकराव शिंदे, जयदत्त होळकर, ललित दरेकर, प्रवीण कदम, शिवा सुरासे यांच्यासह विविध शेतकरी संघटनांचे पदाधिकारी आणि हजारो कांदा उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. लासलगावमधील या विराट आंदोलनाने आता राज्य सरकारसमोर मोठे आव्हान उभे केले आहे.

## कृषि नवोन्मेष आणि उष्मायन केंद्र हे नवसंशोधन आणि कृषि उद्योजकतेसाठीचे प्रभावी व्यासपीठ




**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१८, राहुरी विद्यापीठ** : महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि महाविद्यालय, पुणे येथे उभारण्यात येणारा कृषि नवोन्मेष आणि उष्मायन केंद्र हा प्रकल्प राज्याच्या कृषि क्षेत्रातील नवसंशोधन आणि कृषि उद्योजकतेच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा असेल. या केंद्राच्या माध्यमातून जे संशोधन विस्तारक्षम, विक्री योग्य तसेच उत्पादन वाढीसाठी उपयुक्त ठरेल अशा संशोधनास सर्वतोपरी उपयोगी ठरेल असा विश्वास महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. पुणे कृषि महाविद्यालयामध्ये उभारण्यात येणार्या कृषि नवोन्मेष आणि उष्मायन केंद्र या प्रकल्पाचे भूमिपूजन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. याप्रसंगी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, राज्याचे कृषिमंत्री तथा महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे प्रतिकूलपती दत्तात्रय भरणे, राज्यसभेच्या खासदार मेधा कुलकर्णी, विधान परिषद सदस्य आमदार योगेश टिळेकर, विधानसभा सदस्य आमदार हेमंत रासने, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक राहुल महिवाल, कृषि आयुक्त सुरज मांढरे (भाप्रसे), पुणे जिल्हाधिकारीजितेंद्र डुडी (भाप्रसे) आणि जिल्हा परिषद पुणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील (भाप्रसे), पुणे जिल्हा परिषद, कृषि पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीचे सभापती अमोल नलावडे, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास खर्चे, कार्यकारी परिषदेचे सदस्य दत्तात्रय उगले, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.इंद्रमणी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ.साताप्पा खरबडे, कृषि विभागाचे विभागीय कृषि सहसंचालक दत्तात्रय गवसाने, विद्यापीठ अभियंता मिलिंद ढोके, पुणे कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ.सुभाष भालेकर, सहयोगी संशोधन संचालक डॉ.डी.बी. लाड, आत्मा, प्रकल्प संचालक सुरज मडके आणि पुणे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी संजय काचोळे उपस्थित होते. गेल्या वर्षी आयोजित ॲग्री हॅकथॉन कार्यक्रमादरम्यान मा. मुख्यमंत्री महोदयांनी कृषि महाविद्यालय, पुणे येथे कृषि नवोन्मेष आणि उष्मायन केंद्र स्थापन करण्याची घोषणा केली होती. या गोष्टीच्या पूर्ततेच्या दिशेने महत्वपूर्ण पाऊल उचलत मा. जिल्हाधिकारी, पुणे श्री. जितेंद्र डुडी यांच्या मार्गदर्शनातून या उपक्रमासाठी जिल्हा नियोजन व विकास समितीच्या निधीतून कृषि महाविद्यालय परिसरातील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या इमारतीच्या नूतनीकरणासाठी व संवर्धनासाठी सुमारे चार कोटी १७ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यावेळी कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी या केंद्राची मुख्य उद्दिष्टे व भूमिका विषद करत असताना हे केंद्र तंत्रज्ञान व्यापारीकरण, कृषि क्षेत्रातील कृषि विद्यापीठे आणि संशोधन संस्थांमध्ये विकसित झालेल्या नवीन तंत्रज्ञानाचे पेटंट मिळवणे, त्याचे प्रमाणीकरण करणे आणि ते बाजारात आणण्यासाठी मदत करणे, नवोदित उद्योजक (स्टार्टअप्सना) उद्योग क्षेत्रातील तज्ञ, कृषि वैज्ञानिक आणि व्यावसायिक सल्लागारांची जोडून देणे, पायाभूत सुविधा पुरवणे, तसेच कृषि विद्यापीठे, कार्पोरेट कंपन्या, सरकारी धोरणकर्ते आणि शेतकरी उत्पादक कंपन्या यांच्यात समन्वय साधणारा दुवा म्हणून हे केंद्र काम करील अशी ग्वाही दिली.

## ठाणे जिल्हाधिकाऱ्यांचा शहापूरात अनोखा लोककल्याणकारी पॅटर्न

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१८, दि.१८, ठाणे :** छत्रपती शिवाजी महाराज अभियान शिबिराच्या माध्यमातून जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दुर्गम भागातील कातकरी आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी थेट घरपोच दाखले देण्यापासून ते ७ शाळांना संगणक संच उपलब्ध करून देण्यापर्यंत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय प्रत्यक्षात आणले. याच दौऱ्यात जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांच्या हस्ते ठाणे जिल्ह्यातील पहिल्या पाणंद रस्त्याचे उद्घाटन आणि लोकसहभागातून तलावांतील गाळ काढण्याच्या मोहिमेचा शानदार शुभारंभ करण्यात आला.

कसारा बुद्रुक येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज अभियान शिबिराचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि शहापूर शहापूर तालुक्याचे आमदार दौलत दरोडा यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. या शिबिराचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे, जन्माचा दाखला नसल्यामुळे आजवर अनेक शासकीय योजनांपासून वंचित राहिलेल्या कातकरी आदिवासी समाजातील मुलांना प्रशासकीय तत्परतेमुळे जागेवरच घरपोच जन्मदाखले सुपूर्द करण्यात आले. डिजिटल युगात कातकरी पाड्यावरील विद्यार्थी संगणकीय ज्ञानापासून मागे राहू नयेत, म्हणून जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांच्या पुढाकाराने आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून कातकरी पाड्यावरील सात शाळांना अत्याधुनिक संगणक संच उपलब्ध करून देण्यात आले. या भव्य शिबिरात सामाजिक न्याय विभाग, कृषी विभाग, पुरवठा विभाग, आदिवासी विकास विभाग आणि सातबारा दुरुस्ती यांसारख्या शासनाच्या तब्बल ३० विविध योजनांचा लाभ एकाच छताखाली शेकडो ग्रामीण नागरिकांनी घेतला.

याप्रसंगी बोलताना जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी अत्यंत महत्त्वपूर्ण माहिती दिली. प्रशासनाने मागील अवघ्या तीन महिन्यांत नऊ विविध शिबिरांचे यशस्वी आयोजन करून साधारणतः १३ हजार गरजू लोकांना थेट शासकीय योजनांचा लाभ मिळवून दिला असल्याचे त्यांनी अभिमानाने नमूद केले. शहापूर तालुक्यात प्रशासनाने राबविलेल्या 'घोंगडी बैठक' या अभिनव आणि थेट संवाद साधणाऱ्या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात आले. प्रशासनाच्या या गतिमान आणि संवेदनशील कामाबद्दल आमदार दौलतजी दरोडा, स्थानिक सरपंच, उपसरपंच आणि लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकाऱ्यांचे जाहीर आभार मानले. या संपूर्ण कार्यक्रमाला उपविभागीय अधिकारी अमित सानप, तहसीलदार परमेश्वर कासुळे, गटविकास अधिकारी, । तालुका निरीक्षक भूमी अभिलेख आणि तालुका कृषी अधिकारी यांच्यासह विविध विभागांचे शासकीय अधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## मुलांनो मैदानात या...



आजचे युग हे विज्ञान तंत्रज्ञानाचे युग समजले जाते. २१ व्या शतकातील या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात स्मार्ट फोन, इंटरनेट हे प्रत्येकाच्या जीवनातील अविभाज्य घटक बनले आहेत. केवळ घरातील मोठ्या माणसंकडेच नव्हे तर शाळकरी मुलांकडे देखील मोबाईल फोन पाहायला मिळत आहे. कोरोना काळात ऑनलाइन शिक्षणासाठी पालकांनी घेऊन दिलेला मोबाईल अजूनही मुलांच्या हातात आहे. हाच मोबाईल आज मुलांचा सर्वात जवळचा सहकारी बनला आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मुले मोबाईललाच चिकटून बसलेली असतात. आजच्या विज्ञान तंत्रज्ञान युगात मोबाईल हा गरजेचा आहे. तो गरजेपुरातच वापरला गेला पाहिजे मात्र आज मुलांसाठी मोबाईल हेच सर्वस्व होऊन बसले आहे. आजच्या मुलांना मोबाईलने भुरळ घातली आहे. दिवसातील पाच ते दहा तास मुले मोबाईल वरच असल्याने मुलांची शारीरिक व बौद्धिक वाढ खुंटत चालली आहे त्यामुळे मुलांचे बालपण हरवत चालले की काय अशी शंका मनात येते. आजची मुले जास्त प्रमाणात टीव्ही, संगणक, मोबाईल, इंटरनेट, व्हिडीओ गेम, व्हाट्सएप, फेसबुक, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडियात दंग असतात. तंत्रज्ञानरुपी राक्षसानं मुलांचं बालपणच खाऊन टाकलंय. पूर्वी शाळांना सुट्ट्या लागल्या की गावागावातील मैदाने मुलांनी भरून गेलेली असायची पण आज ती मैदाने विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात ओस पडली असल्याचे चित्र पाहायला मिळते. क्रिकेट वगळता एकही मैदानी खेळ खेळताना मुले दिसत नाहीत. देशी खेळ तर आजच्या मुलांना माहीतच नाहीत. गोट्या, भोवरे, विटीदांडू खेळताना कोणी दिसत नाही. आट्यापाट्या आणि सुरपारंब्या या खेळाचे नियम तर सोडाच पण नावही आजच्या मुलांना माहीत नाही. मोठे रिंगण घेऊन त्यात गोट्यांचा डाव लावल्याचे चित्र आज पाहायला मिळत नाही. गलगुट करून खेळणे व त्यावर राज्य द्यावे लागल्याचे हल्लीच्या मुलांमध्ये ऐकिवातही नाही. भोवऱ्याच्या रिंगणाचीही तीच अवस्था. दगडावर आरी घासून भोवऱ्याला टोक करीत बसलेला मुलगा शोधूनही सापडेनासा झाला आहे. जुन्या कपड्यांचा चेंडू तयार करून खेळला जाणारा रप्पाधप्पीचा खेळ हल्लीच्या मुलांना माहीतही नाही. लपंडाव, विटीदांडू,, लगोरी, कुरघोडी, चंपूल, उडाणटप्पू हे खेळ आता दुर्मिळ झाले आहेत. लंगडी हा खेळ आता फक्त शाळेतील पिटीच्या तासापूरता उरला आहे. या खेळांमुळे मुलांचा शारीरिक व्यायाम व्हायचा शिवाय संघभावना, एकी, आपुलकी, नेतृत्व हे गुण या खेळांमुळे मुलांमध्ये विकसित व्हायचे. या खेळाची जागा आता टीव्ही, संगणक, मोबाईल व्हिडीओ गेम यांनी घेतली आहे. टीव्ही, मोबाईल, संगणक, व्हिडीओ गेममुळे मुलांना विविध खेळांची माहिती उपलब्ध होऊन त्यातून मुलांचा बौद्धिक विकास होतो असे वाटत असले तरी त्यांचा शारीरिक विकास खुंटत चालला आहे याचा समाजातील सर्व घटकांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. मुलांना पुन्हा मैदानाकडे आणण्याची जबाबदारी पालक, शिक्षक व समाजातील सर्वच घटकांची आहे.

**– श्याम ठाणेदार**

# बौद्धिक आळस झटका!

इयत्ता दहावी बारावी परीक्षेचे निकाल लागले आहेत. सर्वसाधारणपणे ज्यांनी सर्वाधिक अभ्यास केला त्याला ९० ते १००% इतके गुण मिळाले आहेत,तर मध्यम अभ्यास करणाऱ्यांना ८० ते ९० टक्के पर्यंत गुण मिळाले आहेत या निकालांची गंमत म्हणजे कमी अभ्यास करणारे देखील ६०% गुणांच्या वर आहेत आणि ज्यांनी अत्यल्प अभ्यास केला ते सुद्धा पास झाले आहेत थोडक्यात जे नापास झाले आहेत त्यांनी वर्षभरात एकूण ५० तास देखील स्वयंअध्ययन केलेले नसेल ज्यांनी एकूण वर्षभरात ५० तास पेक्षा जास्त वेळ अभ्यास केला ते ते सर्वजण पास झाले आहेत म्हणजेच वर्षभरातील ३६५ दिवसा पैकी केवळ दोन ते तीन दिवसाला पाणी अभ्यास करणारे पास झाले आहेत अभ्यास करण्यास म्हणजेच पुस्तकाचे वाचन करण्यास लेखन करण्यास गणिती क्रियांचा सराव करण्यास चिंतन मनन आणि तार्किक विचार करण्यास आळस वाटत असेल तर तुम्ही बौद्धिक दृष्ट्या आळशी आहात. थोडक्यात तुम्हाला बौद्धिक कष्ट नकोसे वाटते.

आपण समाजातील विविध सेवा देणाऱ्या व्यक्तीकडे जेव्हा पाहतो तेव्हा आपल्याला खूपच विसंगत चित्र पाहायला मिळते उन्हात राबराब राबणारे बांधकाम कामगार रंगारी ड्रायव्हर सफाई कामगार विविध कंपन्यातील कामगार हमाल हे सारे अफाट कष्ट घेत असतात परंतु या सर्वांना अगदीच तुटपुंज वेतन असते याउलट डॉक्टर इंजिनिअर वकील सरकारी अधिकारी आणि कर्मचारी शिक्षक प्राध्यापक यांना मात्र सावलीत पंख्याच्या हवे खाली एसी मध्ये काम करावे लागते पण त्यांना मात्र त्यांच्याहून अधिक वेतन असते. हे असे का ? याचे उत्तर इयत्ता दहावी बारावी परीक्षा मध्ये मिळते जे लोक बौद्धिक कष्ट घेतात त्यांना सर्वाधिक लाभ मिळतो. तर जे बौद्धिक आळस माळकतात त्यांना जीवनातील पुढील काळात स्वतःच्या आणि आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी शारीरिक कष्ट घ्यावे लागते त्याचबरोबर त्यांना आर्थिक विवंचनेत आपले अवघे आयुष्य काढावे लागते.

औद्योगीकरणानंतर निर्माण झालेली ही व्यवस्था जरी अन्यायकारक असली तरी तीच आजच्या आधुनिक जगाने अवलंबली आहे हे सत्य सर्वांनी मान्य केले पाहिजे समाजवाद ही एक आदर्श कल्पना म्हणून उरली आहे. अशा काळात सर्वजण बौद्धिक कष्ट करू शकतात आणि सर्वजण स्वतःचा संभाव्य शारीरिक मानसिक आर्थिक छळ थांबू शकतात जी मुले अजून देखील आपल्या भविष्याबाबत जागरूक झाली नसतील त्यांना बौद्धिक कष्टाचे महत्त्व समजून सांगून त्यासाठी त्यांना तयार करावे लागणार आहे जन्मजात अल्पबुद्धी मतिमंद अथवा बौद्धिक दृष्ट्या दुर्बल मुलांना सोडून इतरांना बौद्धिक आळशीपणा झटकून देण्यासाठी विविध उपाय योजावे लागणार आहेत.

माझे मित्र प्रा.डॉ. बापू राऊत यांनी आपल्या फेसबुक वॉलवर आपले विचार पुढील शब्दात मांडले होते – बुद्धिमत्ता उपजत असते , गुणवत्ता नव्हे , गुणवत्ता परिश्रमपूर्वक निर्माण करावे लागते .सोने निसर्गात सापडते. संगमरवर ही निसर्गात सापडतो ; परंतु सोन्याचा अलंकार करण्यासाठी आणि संगमरवराचा ताजमहल उभारण्यासाठी कुशल आणि कल्पक कारागीर लागतो . बुद्धिमत्तेचे गुणवत्तेचे रूपांतर करण्यासाठी देखील सक्षम , कुशल , कल्पक आणि योग्य मार्गदर्शकाची आवश्यकता असते. त्यांच्या या म्हणण्यात नक्कीच सत्य आहे.मार्गदर्शक कल्पक हुशार मिळाले तरी विद्यार्थ्यांनी स्वतः बौद्धिक आळस झटकून स्वतःची अभ्यासासाठी बसण्याची बैठक क्षमता वाढवून उपजत मिळालेल्या बुद्धिमत्तेचा पुरेपूर फायदा घेत स्वतःची गुणवत्ता वाढवली पाहिजे. अर्थातच स्वतःची गुणवत्ता वाढवण्यासाठी बुद्धिमत्तेनुसार प्रत्येक विद्यार्थ्याला कमी जास्त वेळ द्यावा लागणार आहे. उपजत कमी बुद्धिमान असणाऱ्या विद्यार्थ्याला संकल्पना समजण्यास जास्त वेळ लागेल परंतु त्याला ते आपल्या स्वतःच्या बौद्धिक कष्टाने प्राप्त करावे लागणार आहे.

अभ्यासासाठी मेहनत घेणे म्हणजेच तासन्तास वाचत लिहत बसणे यालाच बौद्धिक कष्ट म्हणायचं. विविध समस्या प्रश्न सोडवणे,प्रश्नपत्रिका परत परत सोडवणे, हे सर्व बौद्धिक कष्टाचे प्रकार आहेत.वेळच्यावेळी शंका निरसन करून घेणे,एकदा चुकलेलं परत लिहून काढणं, झालेला चुका समजून घेऊन पुन्हा आपल्या उत्तराचा मसुदा बदलून लिहिणं हा सुद्धा बौद्धिक कष्टाचाच भाग आहे. लिहिणं आणि वाचन त्यापेक्षा विविध माध्यमातून उत्तराचा पाठपुरावा सातत्याने करनं.न कंटाळता आणि अभ्यासाची बैठक न मोडता सर्व लक्ष अभ्यासावर केंद्रित करणं हा बौद्धिक कष्टाचा भाग आहे.आपण अभ्यासाकरिता जो वेळ देतो त्यापेक्षा तो जास्त देणं,त्याचा वेळ वाढवणे आणि इतर गोष्टींना स्वतःपासून काही काळ दूर ठेवणं, एकाग्रता वाढवणे यालाच बौद्धिक कष्ट असे म्हणतात. अर्थातच हे सार करण्यास जो विद्यार्थीदशेपासून सुरुवात करतो त्याला पुढील आयुष्यात बौद्धिक कष्टाचीच अर्थातच सावलीत बसून काम करण्याची नोकरी मिळते आणि जे बौद्धिक आळशी असतात त्यांना मात्र पुढील आयुष्यात शारीरिक कष्ट करण्याशिवाय पर्याय नसतो.

थोडक्यात बौद्धिक आळस झटकून बौद्धिक कष्ट घेण्यास स्वतःला तयार करा हाच सदाचा जीवनात यशस्वी होण्याचा आजच्या काळातील मूलमंत्र आहे.

**– किशोर जाधव**
**– शिक्षक आणि लेखक ,सोलापूर**
**– मो. नं. ९९२२८८२५४१**

# बेरोजगारांची 'क्रुर' चेष्टा !!



ऐकिकडे महाग झालेले शिक्षण, त्यातच शिक्षणाचा घसरलेला दर्जा आणि झालेला बट्ट्याबोळ, त्यात भर पडत आहे ती पेपरफुटीची. जवळपास अशी एकही स्पर्धा परीक्षा होत नाही ज्यामधे काही गडबड होत नाही. पेपरफुटी, परिक्षेतील गोंधळ झाला कि वेठीस धरला जातो तो युवकच. लाखो करोडो रुपये खर्च करुन परिक्षा ऊत्तीर्ण झालेला युवक हातात डिग्री घेऊन वणवण कामासाठी भटकतो आणि बेरोजगार रहातो. आणि कधीकधी या व्यवस्थेविरुद्ध आपला असंतोष व्यक्त केला कुछ युवकांना मिळतो तो पोलिसांच्या काठीचा प्रसाद, कारवाईचा. आणि जे पेपर फुटी, परिक्षा गोंधळास जबाबदार आहे ते मात्र मोकाट रहातात. बेरोजगारी ही समस्या काही युवकांनी निर्माण केलेली नाही तर त्याला जबाबदार शासन-प्रशासन, न्यायव्यवस्था हे सगळेच जबाबदार आहेत.हेच युवक देशाचे ऊद्याचे भविष्य आहे. एखाद्याच्या घरात तरुण बेरोजगार युवक बसुन असेल तर त्या घराची मनस्थिती काय असते हे ज्याचे जळते त्यालाच कळते. अशा बेरोजगारांना आपण किमान जगण्याऐवढे ही काम देऊ शकत नाही याची खरतर राज्यकर्त्यांना आणि नागरिकांच्या हक्काचे रक्षण करण्याची जबाबदारी असलेल्या न्यायव्यवस्थेला खंत वाटली पाहिजे. हेच युवक देशाचे ऊद्याचे भविष्य आहेत, जबाबदार नागरिक आहेत. ऐतखाऊ पणा म्हणून कोणी स्वेच्छेने बेरोजगार राहु इच्छित नाही मिळेल ते काम व्यवसाय करण्यासाठी तो प्रयत्न करताच असतो. रोजगारांबद्दल सहानुभूती दाखवणे गरजेचे असतांना ऊलट त्यांच्यावरच जखमेवर मीठ चोळले जात आहे.जस्टीस डिलेड ईज जस्टिस डिनाईड असे असेल तर त्याचे काय करायचे? आता केव्हा तरी हा निकाल लागला तरी न्याय झाला असे म्हणता येईल का? देशाच्या लोकशाहीच्या दृष्टीने इतक्या महत्वाच्या प्रकरणाचा निकाल जर वर्षानुवर्षे लागत नसेल तर याचा अर्थ कसा काढायचा?.

देशाचे सरन्यायाधीश पद अत्यंत महत्त्वाचे पद आहे, लोकशाहीचा तो महत्वाचा स्तंभ आहे. संसद, कार्यपालिका, माध्यमे हे तीनही स्तंभ डळमळीत झाले आहेत म्हणूनच जनता मोठ्या अपेक्षेने न्यायव्यवस्थेकडे पहाते. राष्ट्रपती, पंतप्रधान, पंतप्रधान या बरोबरच सरन्यायाधीश हे अतिशय महत्वाचे पद आहे त्यामुळे त्यांचे अधिकार आणि जबाबदारी देखील तितकीच आहे. केवळ न्यायदान करणे एवढीच जबाबदारी नाही तर, घटनेचे रक्षण करणे, संसदेने बनविलेले कायदे हे घटनेच्या चौकटीत आहेत कि नाही आणि त्याची वैधता तपासणे तसेच कायद्याचा अर्थ लावणे, नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करणे ही देखील न्यायव्यवस्थेची जबाबदारी आहे. मात्र गेल्या काही वर्षांपासून न्यायव्यवस्थेवर देखील अनेक प्रश्न निर्माण होऊ लागले आहे. न्यायालयांच्या निकालाबाबत आता ऊलटसुलट चर्चा होऊ लागली आहे आणि अनेक निर्णय हे सरकारधार्जिणे होत असल्याची जनतेची भावना बनत चालली आहे. काही दिवसांपूर्वी एका वकिलाबाबत भाष्य करताना सरन्यायाधीशांनी तरूणांना, बेरोजगारांना ऊद्देशुन अतिशय संतापजनक वक्तव्य केले टीका झाल्यानंतर स्पष्टीकरण दिले मात्र जे व्हायचे ते घडुन गेलेच.मुळात ज्या केस च्या वेळी त्यांनी हे भाष्य केले त्याचा काहीही संदर्भ नव्हता, तरी देखील त्यांनी मनातली खदखद अशी व्यक्त का करावी हे अनाकलनीय आहे. याऊलट बेरोजगारीच्या बाबतीत त्यांनी सरकारचे कान टोचले असते तर ते अधिक योग्य ठरले असते. त्याच बरोबर त्यांनी ज्यांना काही काम मिळत नाही ते माहिती अधिकार कार्यकर्ते, पत्रकार, बनतात, सोशल ॲक्टिव्हिस्ट बनतात आणि व्यवस्थेला आव्हांन देतात असे ते बोलुन गेले. व्यवस्था जर भ्रष्ट झाली असेल, भरकटली असेल तर कोणीतरी बोलणारच आणि असे व्यक्त होणे म्हणजे काही देशद्रोह नाही. आजच्या घडीला जवळपास सर्वच व्यवस्था भ्रष्टाचाराने बरबटलेल्या आहेत आणि अशांची चलती आहे. वास्तविक बेरोजगारी बाबत सरन्यायाधीशांनी सरकारचे कान टोचले असते तर ते अधिक योग्य ठरले असते. न्यायाधिशांनी कमी बोलले पाहिजे आणि निकालातुन आपले कर्तृत्व सिद्ध केले पाहिजे. मात्र गेल्या काही वर्षांपासून अनेक न्यायाधिश अनावश्यक टीप्पणी करतात आणि नाहक वाद ओढवुन घेतात. व्यक्तिशः न्यायाधिशांवर टीका करणे अयोग्यच आहे. अगोदरच महागाईच्या आगडोंबात, बेरोजगारीत देशाचे ऊद्याचे भविष्य असलेल्या तरुणाईवर बेरोजगारीचे संकट आहे याबाबत न्यायव्यवस्था म्हणून आपली जबाबदारी पार न पाडता सरन्यायाधीशांनी नाहक वाद ओढवुन घेतला. महाराष्ट्रातील आमदाराची अपात्रता, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या पक्ष आणि चिन्हाचा निकाल तीन वर्षांहुन अधिक काळ लोटला तरी लागत नाही, सरन्यायाधीशांनीच हे प्रकरण आम्हाला निकाली काढायचे आहे असे वर्षभरापूर्वी सांगितले होते मात्र केवळ तारीख पे तारीख पलिकडे काही होत नाही असे असतानाही ते इतरांना का जबाबदार धरत आहेत. गेल्या काही वर्षांपासून न्यायव्यवस्थेचे देखील राजकियीकरण झाले आहे त्याची ही परिणती समजायची का?. बेरोजगारांबद्दल सहानुभूती दाखवता येत नसेल तर किमान त्यांची क्रूर चेष्टा तरी करु नका. सरन्यायाधीश सारख्या अतिमहत्त्वाच्या पदावर बसलेल्या व्यक्तींकडुन जबाबदार चाल चलन चरित्र ची अपेक्षा आहे. सगळीकडे सत्ता, अधिकार, पदाचा सदुपयोगापेक्षा दुरुपयोगच अधिक होत आहे. प्रत्येक नागरिकाला व्यक्त होण्याचा अधिकार आहे किमान तो तरी हिसकावून घेऊ नका.

**– अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

## ऑलवेल

परिक्षेतले ऑलवेल
अधिक पेपर लीक
थोडेसे इकडेतिकडे
रे बाकी सगळे ठीक

मदत दिली मुलांना
बिचारे जरासे वीक
लाच देई स्वखुशीने
कुणी ना मागे भीक

सामुहिक हो कॉपी
उरेल ना झिकझीक
कॉपी हेचं पुण्यकर्म
फायदे होई उदयीक

पेट्रोल संपले म्हणून
गाडीस मारते कीक
कोचिंग क्लास खरा
तारणहारअत्याधिक

पडू द्या शाळा ओस
प्रश्न नकरे भावनीक
पीकआले भरभरून
जमिनी जरी नापीक

छानकाढला सन्मार्ग
यंत्रणेचे डोके सुपीक
अभ्यासनको वर्षभर
उत्तीर्णव्हायला शीक

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# अजितदादांच्या राष्ट्रवादीला कोण सावरणारं ?

राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा अजित पवारांचा मृत्यू होवून पाच महिने होत आले. दरम्यान या काळात पक्षात सातत्याने अनपेक्षित घटना घडत आहेत. त्यामुळे राष्ट्रवादीचे काय होणारं असा प्रश्न निर्माण होतो आहे. पक्षावर अजितदादांची कमांड मोठी होती मात्र त्यांच्या मृत्यूनंतर पक्षात जे राजकारण सुरु आहे ते योग्य नाही त्यामुळे आता त्या पक्षाचे काही खरे नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. परत एकदा अजित पवार कुटुंबियांच्या हाती सत्ता एकवटल्याने पक्षामध्ये अस्वस्थता पसरली आहे. काहीजण दुसऱ्या पक्षात प्रवेश करत आहेत.

तर राष्ट्रवादीचे बडे नेते प्रफुल्ल पटेल आणि सुनिल तटकरे हे राष्ट्रवादीमधील २२ आमदार घेवून भाजपामध्ये जाणारं अशी आवई राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी उठवली आहे. त्यामुळे आगामी काळात पक्षाचे काय होईल ते सांगता येईना अजित पवार असताना महाराष्ट्रात पक्षाचा मोठा प्रभाव असल्याने राष्ट्रवादी सत्तेच्या अग्रस्थांनी होता. मात्र सद्या अनेक ठिकाणी पक्ष बॅकफुटवर जाताना दिसत आहे. त्यामुळे येत्या काळात आपले सोयीचे राजकारण पाहून नेते, कार्यकर्ते दुसऱ्या पक्षात प्रवेश करतील हे नाकारता येत नाही अडचणीच्या काळात पक्षाला सावरणे आणि पुन्हा गतवैभव मिळवून देणे हे कार्यकर्ते आणि पक्षनेतृत्वाचे काम आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात राष्ट्रवादीचे काय होते ते पहाणे मोठे औत्सुक्याचे ठरणारं आहे.

**– राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## नेचर फाउंडेशनच्या वतीने आंतरजातीय-आंतरधर्मीय सत्यशोधक सामूहिक विवाह सोहळा संपन्न



**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.१८, चिमूर (चंद्रपूर) :** महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सत्यशोधक विचारांची आणि भारतीय संविधानातील समता, बंधुता व सामाजिक न्यायाच्या मूल्यांची जोपासना करत यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही आंतरजातीय व आंतरधर्मीय सत्यशोधक सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. शहीद बालाजी रायपुरकर सभागृह, चिमूर येथे पार पडलेल्या या अनोख्या विवाह सोहळ्याने समाजात सामाजिक ऐक्य, मानवता आणि जातिव्यवस्थेविरोधातील प्रबोधनाचा ठोस संदेश दिला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ॲड.असीम सुहास सरोदे, इंजि.भाऊसाहेब थूटे, डॉ.भगवान नन्नावरे, ॲड.भूपेश पाटील तसेच माधव गुरनुले आदी मान्यवर उपस्थित होते.नेचर फाउंडेशन गेल्या ५ वर्षांपासून महाराष्ट्रभर शैक्षणिक, सामाजिक आणि पर्यावरणीय क्षेत्रात कार्यरत असून सामाजिक बांधिलकी जपत समाजातील जातीय भेदभाव, धार्मिक कट्टरता आणि विषमता याविरोधात सातत्याने जनजागृती करत आहे. जात ही जगातील सर्वात क्रूर व्यवस्था असून ती माणसामाणसांत भिंती उभ्या करते, असे मत व्यक्त करत संस्थेच्या माध्यमातून सामाजिक समतेची चळवळ उभारण्यात येत आहे.संस्थेचे संस्थापक निलेश नन्नावरे आणि स्नेहा यांनी स्वतः आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाह करून समाजापुढे आदर्श निर्माण केला. परिवर्तनाची सुरुवात स्वतःपासून या विचारातून त्यांनी हा उपक्रम सुरू केला असून समाजात आंतरजातीय विवाहांविषयी सकारात्मक दृष्टी निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

यावर्षीच्या उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील सात आंतरजातीय व आंतरधर्मीय जोडप्यांचा सामूहिक विवाह पार पडला, तर ३० जोडप्यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. संविधानिक मूल्यांवर आधारित हा विवाह सोहळा उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ॲड.असीम सुहास सरोदे यांनी सांगितले की, संविधानिक मूल्ये समाजात रुजविण्यासाठी युवकांनी पुढाकार घेणे अत्यंत गरजेचे आहे. नेचर फाउंडेशनच्या माध्यमातून युवकांमध्ये निर्माण होत असलेली ही सामाजिक जाणीव आशादायी आहे. जेव्हा संविधानातील मूल्ये प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचतील, तेव्हाच खऱ्या अर्थाने संविधानाचा विजय होईल. तर इंजि. भाऊसाहेब थूटे यांनी आपल्या प्रबोधनात्मक कीर्तनातून जातीभेदामुळे समाजात निर्माण झालेली फूट आणि त्याचा राजकीय वापर यावर भाष्य केले. समाजाने जातीच्या चौकटी मोडून मानवतेचा विचार स्वीकारण्याचे आवाहन त्यांनी केले.ॲड. भूपेश पाटील यांनी बोलताना ग्रामीण भागात अशा प्रकारचे सामाजिक परिवर्तन घडविणारे उपक्रम राबविणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. चिमूरसारख्या ग्रामीण भागातून सामाजिक समतेचा नवा विचार पुढे येत आहे, ही अभिमानाची बाब आहे, असे ते म्हणाले.

या विवाह सोहळ्यात सहभागी सर्व जोडप्यांचा नेचर फाउंडेशनच्या वतीने सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन संस्थेचे उपाध्यक्ष बादल श्रीरामे यांनी केले. प्रास्ताविकात संस्थापक निलेश नन्नावरे यांनी गेल्या ४ वर्षांतील शैक्षणिक, सामाजिक आणि पर्यावरणीय कार्याचा आढावा मांडला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन समन्वयक सुरज दडमल यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता नेचर फाउंडेशन टीम चे आशिष जीवतोडे, अमोल कावरे, मंगेश सहारे, मंगेश राऊत, वैभव तलमले, प्राची गजबे, रुचिका घोडमारे, स्नेहा नन्नावरे, गुंजन सावसाकडे सतीश तळेकर यांनी सहकार्य केले.

## पोलिस दलातील सेवा निवृत्त अधिकारी काशिनाथ दिवटे यांचे निधन



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१९, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील बाबुर्डी येथील कै.काशिनाथ कोंडीबा दिवटे पोलिस दलातील कर्तव्यदक्ष अधिकारी, सेवा पुर्तीनंतर वयाच्या ७८ व्या वर्षी अल्पशा आजाराने दुखत निधन झाले.त्यांच्या पाठीमागे पत्नी, दोन मुले, दोन मुली असा त्यांचा परीवार आहे.

बाबुर्डी पंचक्रोशीतील एक आदर्श व्यक्ती महत्व म्हणुन त्यांची ओळख होती,समाज कार्यात ही त्यांचा फार मोलाचा वाटा असे,धार्मिक क्षेत्रात ही त्यांचे फार मोठे योगदान दिले,त्यांच्या जान्याने संपुर्ण गाव हे दुख सागरात बुडाल्याचे चित्र पहावयास मिळाले,त्याचा दशक्रिया विधी दि.२० रोजी बुधवारी बाबुर्डी हंगा नदी तिरी होणार आहे.

# नगर - कल्याण महामार्गावरील आंदोलनप्रकरणी राजदेव यांच्यासह, १५ कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल

## पारनेर पोलीसांची कारवाई; १५ जण नामनिर्देशित, ४० ते ५० आंदोलकांवरही गुन्हे

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, पारनेर (अहिल्यानगर) :** कांदा उत्पादक शेतकर्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी नगर-कल्याण राष्ट्रीय महामार्गावर टाकळी ढोकेश्वर येथे रस्ता रोको आंदोलन करणार्या आंदोलकांना आंदोलन भोवले. पारनेर पोलिसांनी आंदोलनाचे नेतृत्व करणारे सरपंच रवींद्र राजदेव यांच्यासह १५ प्रम ुख नेते, कार्यकर्ते आणि इतर ४० ते ५० जणांवर गुन्हे दाखल केले आहेत.

राष्ट्रीय महामार्ग अडवून वाहतुकीस अडथळा निर्माण करणे, जमावबंदीच्या आदेशाचे उल्लंघन करणे आणि विनापरवाना आंदोलन छेडणे या कारणांवरून पोलिसांनी ही कायदेशीर कारवाई केली आहे. पारनेर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, याप्रकरणी नांदूर पठारचे सरपंच रवींद्र राजाराम राजदेव यांच्यासह काताळवेढा येथील पोपट गुंड, भोंद्रे येथील सरपंच अभिजित झावरे, सरपंच प्रकाश गाजरे, बाबासाहेब बांडे आणि टाकळी ढोकेश्वरचे दत्तात्रय झावरे यांच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे सावरगावचे संतोष चिकणे, निघोजचे जालिंदर लंके, नितीन खोडदे, खडकवाडीचे संतोष शिंदे, चोंभूतचे दादाभाऊ खांडकर, रफिक शेख, कासारे येथील पोपटराव नरड, सतीश भालेकर आणि नांदूर पठारचे रवींद्र बबन चौधरी यांच्यावरही गुन्हे दाखल झाले आहेत. या १५ जणांशिवाय आंदोलनात सहभागी असलेल्या इतर ४० ते ५० अज्ञात आंदोलकांवरही नाव आणि गाव माहिती नसल्याने गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**पोलीस कारवाईनंतर राजकीय वातावरण तापणार?**

शेतकर्यांच्या न्याय्य हक्कांसाठी शांततेच्या मार्गाने आंदोलन करणार्या लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करणे हा अन्याय आहे. मुख्यमंत्र्यांनी स्वतः या आंदोलनाची दखल घेतली असताना, पोलिसांनी केलेली ही कारवाई दुर्दैवी आहे. आम्ही या कारवाईचा तीव्र निषेध करतो. सरकारने शेतकऱ्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केल्यास, आगामी काळात पूर्ण पारनेर तालुक्यात आणि जिल्ह्यात तीव्र राजकीय पडसाद उमटतील आणि हे आंदोलन आणखी तीव्र केले जाईल, असा इशारा शेतकरी संघटना व स्थानिक नेत्यांनी दिली आहे.

# रस्ता पूर्ण नाही, उद्घाटन नाही मग टोल कसला...? – स्थानिक वाहनांना टोलमाफीची मागणी

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.१८, माथेरान :** अपूर्ण अवस्थेत असलेल्या मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर सुरू करण्यात आलेल्या टोलवसुलीविरोधात आता रायगड जिल्ह्यात संतापाची लाट उसळली असून, रायगड प्रेस क्लबने प्रशासनाला थेट इशारा दिला आहे. जोपर्यंत मुंबई-गोवा महामार्गाचे काम पूर्ण होत नाही आणि अधिकृत उद्घाटन होत नाही, तोपर्यंत टोलवसुली तात्काळ बंद करण्यात यावी, अशी जोरदार मागणी रायगड प्रेस क्लबच्या वतीने करण्यात आली आहे.

अर्धवट रस्ता, ठिकठिकाणी खड्डे, सुरू असलेली कामे, वाहतूक कोंडी आणि अपघातांचा वाढता धोका यामुळे नागरिक त्रस्त असताना प्रशासन मात्र जनतेच्या खिशावर टोलचा अतिरिक्त भार टाकत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. जनतेला सुविधा नाहीत, सुरक्षितता नाही, मग टोल वसुली कोणत्या आधारावर केली जाते? असा संतप्त सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला. विशेषतः MH-46 आणि MH-06 या स्थानिक नोंदणी क्रमांकाच्या वाहनांना तात्काळ टोलमाफी देण्यात यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली. स्थानिक नागरिक, व्यापारी, शेतकरी आणि रोज प्रवास करणाऱ्या वाहनधारकांवर अन्यायकारक आर्थिक बोजा टाकला जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच खारपाडा येथे सुरू असलेली टोलवसुली तातडीने बंद करण्यात यावी, अन्यथा रायगड जिल्ह्यातील



पत्रकारांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देखील रायगड प्रेस क्लबने प्रशासनाला दिला आहे. जनतेच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका, अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याशिवाय पर्याय उरणार नाही, असा आक्रमक पवित्रा पत्रकार संघटनांनी घेतला आहे. यासंदर्भात आज सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल कार्यालय येथे संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी रायगड प्रेस क्लब चे अध्यक्ष प्रशांत गोपाळे, माजी अध्यक्ष विजय मोकल, अनिल भोळे, रायगड प्रेस क्लबचे खजिनदार भारत गोरेगावकर, रविंद्र मोरे, दिनेश सुतार तसेच पनवेल महानगर प्रेस क्लबचे तालुकाध्यक्ष प्रशांत शेडगे आणि अन्य पदाधिकारी उपस्थित होते. रायगड प्रेस क्लबच्या या भूमिकेमुळे आता प्रशासन काय निर्णय घेते याकडे संपूर्ण रायगड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# शेतकरी महिला घेणार स्वामींची परीक्षा - 'देऊळ बंद 2' चा टीझर प्रदर्शित

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१८, पंढरपूर :** श्रद्धा आणि अंधश्रद्धा, देव आणि नास्तिक यांच्यातील युद्धाने आजवर अनेक वळणे घेतली आहेत. मात्र, जेव्हा एक सामान्य स्त्री थेट देवालाच परीक्षेला बसवते, तेव्हा काय होते? याच उत्कंठावर्धक विषयावर आधारित २१ मे रोजी प्रदर्शित होणाऱ्या 'वटवृक्ष एंटरटेनमेंट' निर्मित बहुचर्चित आणि बहुप्रतीक्षित देऊळ बंद २ चा टीझर आज श्री क्षेत्र अक्कलकोट येथील वटवृक्ष श्री स्वामी समर्थ मंदिरात प्रदर्शित करण्यात आला. अनेक स्वामी भक्तांच्या उपस्थितीत अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या दिमाखदार सोहळ्याला निर्माते आणि चित्रपटाच्या संपूर्ण टीमसह राजकीय, प्रशासकीय आणि सामाजिक कार्य करणाऱ्या मान्यवरांची उपस्थिती लाभली.




या प्रसंगी दाखविण्यात आलेल्या टीझरने उपस्थित भक्तांच्या आणि रसिकांच्या मनात चित्रपटाची उत्सुकता अजूनच वाढली आणि सर्वांनी देऊळ बंद २ आम्ही चित्रपटगृहात जाऊन नक्की बघणार अशी ग्वाही दिली.

देऊळ बंद २ - आता परीक्षा देवाची च्या टीझरमध्ये आस्तिक शेतकऱ्याची नास्तिक पत्नी असणाऱ्या स्नेहल तरडे उद्विग्न अवस्थेत आपला नवरा देऊळ बंद करून चावी घेऊन कुठेतरी निघून गेला असल्याची तक्रार घेऊन स्वामींना बोलाविण्यासाठी अत्यंत रागाने वारुळावर दगड मारते आणि स्वामी प्रकट होतात कारण भक्ताने मनापासून बोलावले की देव येतोच. त्यानंतर स्वामींचा विविध वाहनातून प्रवास दाखवताना काही दिग्गज कलाकारांची झलक पाहायला मिळते. पुढच्या प्रसंगात स्वामी म्हणतात अगं ए नास्तिके प्रत्येक युगात तुझ्या सारखे कित्येक रावण आणि कित्येक दुर्योधन पाहिलेत मी देवाची परीक्षा पाहणारे त्यावर शेतकरी महिला म्हणते लिहून देते, कधी शेतकरी नसल पाहिला. त्यांच्या या संवादावरून देऊळ बंद २ मध्ये आपल्या कुटुंबासाठी आणि समाजासाठी एक गरीब शेतकरी महिला देवाची सुद्धा परीक्षा घेऊ शकते हे स्पष्ट होत आहे. शेवटच्या प्रसंगात स्नेहल तरडे स्वामींना परत जायला सांगतात पण तू परीक्षेला बसवलं आहे ना? त्यामुळे परीक्षा दिल्या शिवाय मी जाणार नाही... आता परीक्षा देवाची असे म्हणत स्वामी जायला नकार देतात. नदीकाठचा निसर्गरम्य परिसर, भव्य वडाचे झाड आणि एका बाजूला स्वामींची जरब तर दुसऱ्या बाजूला एका सामान्य स्त्रीचे धैर्य, असा हा सामना खिळवून ठेवणारा आहे. आता या परीक्षेत स्वामी कोणत्या प्रश्नांना समोरे जाणार आणि शेतकऱ्यांच्या कोणत्या समस्यांचे निवारण करणार? हे बघण्यासाठी प्रेक्षकांना २१ मे पर्यंत वाट बघावी लागणार आहे.

२१ मे २०२६ रोजी प्रदर्शित होणाऱ्या वटवृक्ष एंटरटेनमेंट निर्मित देऊळ बंद २ चे लेखन आणि दिग्दर्शन प्रविण विठ्ठल तरडे यांनी केले असून निर्मिती कैलाश वाणी, जयश्री कैलाश वाणी, कैवल्य वाणी आणि जुईली वाणी-सूर्यवंशी यांनी केली आहे. चित्रपटात मोहन जोशी आणि स्नेहल तरडे प्रमुख भूमिकेत दिसणार असून महेश मांजरेकर, प्रसाद ओक, मंगेश देसाई, ओम भुतकर, संस्कृती बालगुडे, जगन्नाथ निवंगुणे, सुनील अभ्यंकर, अतुल कुडले आणि प्रविण तरडे म हत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहेत.




**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.१८, माथेरान :** माथेरान हे रायगड जिल्ह्यातील जगप्रसिद्ध थंड हवेचे पर्यटनस्थळ म्हणून ओळखले जाते. नैसर्गिक सौंदर्य, हिरवाई आणि शांत वातावरणामुळे देश-विदेशातील पर्यटक येथे मोठ्या प्रमाणात भेट देतात. येथील स्थानिक नागरिक, व्यापारी, स्टॉलधारक, मजूर आणि छोटे व्यावसायिक आजही प्रामाणिकपणे कष्ट करून पर्यटकांचे आदरातिथ्य करत आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करताना दिसतात. साधेपणा, आपुलकी आणि मदतीची भावना ही माथेरानच्या भूमिपुत्रांची खरी ओळख मानली जाते.

मात्र पर्यटनाच्या वाढत्या व्यापानंतरही स्थानिक नागरिक आर्थिकदृष्ट्या सक्षम होताना दिसत नाहीत. गेल्या काही वर्षांत बाहेरील लोकांनी विविध व्यवसायांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रवेश करून स्वतःचे वर्चस्व निर्माण केले आहे. स्थानिकांच्या मदतीने आणि काही राजकीय आशीर्वादामुळे जंगल परिसरात अनधिकृत बांधकामे वाढल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. त्यामुळे स्थानिकांच्या हक्कांवर गदा येत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

**पाणी टंचाईचा प्रश्न गंभीर**

माथेरानला उन्हाळ्यात नेरळ येथील उल्हास नदीतून पाणीपुरवठा केला जातो, तर पावसाळ्यात काही महिन्यांसाठी हा पुरवठा बंद ठेवला जातो. राज्यातील इतर भागांच्या तुलनेत माथेरानमध्ये पाण्याचे दर अधिक असल्याची स्थानिकांची तक्रार आहे. त्यातच पाईपलाईनमधून अनेक ठिकाणी अनधिकृत जोडण्या घेऊन पाण्याची चोरी होत असल्याचे प्रकार समोर येत आहेत. काही ठिकाणी पाईपलाईन फोडून पाणी वळवले जात असल्याने स्थानिकांना कमी दाबाने पाणी मिळते.

भविष्यातील गरजा लक्षात घेता, पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात मोरबे धरणात जाणारे पाणी योग्य नियोजनातून माथेरानसाठी वापरण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. यामुळे पाणीटंचाईचा प्रश्न मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतो, असे मत व्यक्त केले जात आहे.

**एकमेव घाटरस्त्यामुळे वाढती कोंडी**

नेरळ ते माथेरान हा एकमेव वाहन घाटरस्ता असून त्याच मार्गाच्या बाजूने मिनी ट्रेनची वाहतूक सुरू असते. पर्यटन हंगामात वाहनांची संख्या मोठ्या प्रम ाणात वाढत असल्याने पार्किंग आणि वाहतूक व्यवस्थेवर ताण निर्माण होत आहे. काही प्रमाणात पार्किंग सुविधा वाढवण्यात आल्या असल्या तरी भविष्यातील वाढती गर्दी लक्षात घेता अधिक सक्षम नियोजनाची गरज व्यक्त होत आहे.

**वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा**

माथेरानचा वीजपुरवठा सध्या नेरळ मार्ग केला जातो. त्यामुळे खाली तांत्रिक बिघाड झाल्यास त्याचा थेट परिणाम माथेरानवर होतो. वारंवार होणाऱ्या वीज खंडिततेमुळे स्थानिक नागरिक आणि पर्यटक दोघांनाही त्रास सहन करावा लागतो. पनवेल मार्गे स्वतंत्र वीजपुरवठा व्यवस्था उपलब्ध झाल्यास हा प्रश्न कायमस्वरूपी सुटू शकतो, अशी मागणी स्थानिकांकडून केली जात आहे.

**पर्यायी वाहतूक व्यवस्थेची गरज**

जगप्रसिद्ध पर्यटनस्थळ असल्यामुळे माथेरानमध्ये वर्षभर पर्यटकांची वर्दळ असते. मात्र नेरळ ते माथेरान हा नागम ोडी घाटरस्ता नवख्या वाहनचालकांसाठी धोकादायक ठरत असल्याचे अनेकदा दिसून आले आहे. अरुंद व वळणदार रस्त्यांमुळे किरकोळ अपघाताच्या घटनाही घडत असतात.

स्थानिक नागरिकांच्या मते, म ाथेरानसाठी फ्युनिक्युलर, रोपवे किंवा अन्य पर्यायी वाहतूक सुविधा उपलब्ध झाल्यास पर्यटकांसह स्थानिकांनाही म ोठा दिलासा मिळू शकतो. मात्र राजकीय इच्छाशक्तीअभावी हा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. शासनाने विशेष पर्यटनस्थळ म्हणून माथेरानच्या विकासासाठी ठोस पावले उचलण्याची मागणी आता अधिक तीव्र होत आहे.

# डोक्यात हातोडा घालून चुलत्यानेच केला पुतण्याचा खून



## पारनेरच्या भांडगावातील खूनाचा एल.सी.बी. कडून उलगडा

**मोबाईल मधील तो फोटो ठरला खुनाचा पुरावा**

घरगुती वादातून महेश खरमाळे याने पुतण्या संदीप खरमाळे यांचा काटा काढण्याचा कट रचला होता. शुक्रवारी पहाटे तो संदिप यांच्या घरी गेला आणि हातोड्याने डोक्यात वार करून त्यांचा खून केला. त्यानंतर घरातील रोकड घेऊन तो पसार झाला. दरम्यान, घटनास्थळी असतानाच महेशच्या मोबाईलमध्ये चुकून एक फोटो काढला गेला. तपासादरम्यान महेशवर संशय आल्याने त्याला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याचा मोबाईल तपासला असता घटनास्थळाचा तो फोटो आढळून आला. विशेष म्हणजे, फोटो काढण्याची वेळ आणि खून झाल्याची वेळ एकच असल्याचे तांत्रिक तपासात स्पष्ट झाले. हा महत्त्वाचा पुरावा हाती लागताच पोलिसांनी महेशची कसून चौकशी केली. अखेर पोलीसी खाक्या दाखवताच महेशने गुन्ह्याची कबुली दिली.

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, अहिल्यानगर :** पारनेर तालुक्यातील भांडगाव येथील शेतकरी संदीप खरमाळे यांच्या खून प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या २४ तासांत उलगडा करत धक्कादायक सत्य समोर आणले आहे. संदीप खरमाळे यांच्या चुलत्यानेच, म्हणजे महेश हनुमंत खरमाळे (वय ४५, रा. भुजबळ वस्ती, भांडगाव) याने घरगुती वादातून हातोड्याने डोक्यात वार करून त्यांचा खून केल्याची कबुली पोलिसांसमोर दिली आहे. महेश खरमाळे याला अटक करण्यात आली असून त्याच्याकडून १०लाख ८४ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात दिनांक १६ मे २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. फिर्यादी सिध्देश संदीप खरमाळे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, अज्ञात व्यक्तीने चोरीच्या उद्देशाने त्यांच्या वडिलांच्या डोक्यात घातक वार करून खून केला होता. तसेच घरातील सुमारे १२ लाख ७० हजार रूपयांची रोकड व सोन्याचे दागिने चोरीस नेण्यात आले असल्याचे फिर्यादीत नमूद होते.


घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांनी घटनास्थळी भेट देऊन तपास संदर्भात सूचना दिल्या. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आली.

या पथकात सहायक पोलीस निरीक्षक हरिष भोये, संदीप मुरकुटे तसेच अंमलदार फुरकान शेख, श्यामसुंदर जाधव, बाळासाहेब खेडकर, मनोज साखरे, आकाश काळे, विशाल तनपुरे आणि भगवान धुळे यांचा समावेश होता. पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण, गोपनीय माहिती आणि संशयितांच्या हालचालींचा बारकाईने अभ्यास करत तपासाची सूत्रे वेगाने फिरवली. तपासादरम्यान महेश खरमाळे याच्यावर संशय निर्माण झाला. तो भांडगाव – जामगाव रस्त्यावरून दुचाकीवर जात असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले.

सुरवातीला उडवाउडवीची उत्तरे देणाऱ्या महेशने अखेर पोलीस चौकशीत गुन्ह्याची कबुली दिली. दिनांक १५ मे २०२६ रोजी पहाटे त्याने स्वतःच्या पुतण्याच्या घरी जाऊन हातोड्याने डोक्यात वार करून संदिप खरमाळे यांचा खून केला. त्यानंतर घरातील रोख रक्कम चोरून नेल्याचे त्याने कबूल केले. पोलिसांनी महेश कडून १० लाख २९ हजार रुपयांची रोकड, मोबाईल फोन, दुचाकी, मयताचे आधारकार्ड आणि एक पांढरी दोरी असा एकूण १० लाख ८४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# थोडक्यात

## मंद्रुप येथे शेततळ्यात बुडून दोन चिमुकल्यांचा मृत्यू





**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.१८, सोलापूर :** मंद्रुप येथील नाईक नगर तांड्यावरील १२ व १३ वर्षाच्या दोन शाळकरी मुलांचा दिनांक १७ मे २०२६ रोजी दुपारी शेततळ्यात पोहण्यासाठी गेल्यानंतर बुडून मृत्यू झाला. या दुर्देवी घटनेत जीव गमावलेल्या मुलांचा मृतदेह पाहून नाईकनगर तांडा हळहळला. समर्थ मोहन चव्हाण (वय १३) व ओंकार रमेश चव्हाण (वय १२) दोघेही राहणार नाईकनगर मंद्रूप (ता.दक्षिण सोलापूर) असे शेततळ्यात बुडून मृत्यू झालेल्या मुलांची नावे आहेत.

मंद्रुप पोलीस ठाण्यात याची नोंद झाली आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की, मंद्रूप – वांगी रस्त्यावर नाईक नगरच्या पुढे मोहन थावरू चव्हाण यांची शेती आहे. त्यांच्या शेतातील शेततळ्यात पोहण्याकरीता दुपारी समर्थ चव्हाण व ओंकार चव्हाण गेले होते. सायंकाळी सहा वाजले तरी दोन्ही मुले घरी परत न आल्याने शालनबाई थावरू चव्हाण व शिवाजी चव्हाण हे मुलांच्या शोधासाठी गेले. शेततळ्यावर जाऊन पाहिले असता दोन्ही मुले पाण्यावर तरगंत असल्याचे दिसले. लागेच नाईक नगर तांड्यावरील काही लोकांना बोलावून पाण्यातून बाहेर काढले. खाजगी वाहनातुन उपचाराकरिता बेशुध्द अवस्थेत ग्रामीण रुग्णालय मंद्रुप येथे दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून दोघांचा ही उपचारापूर्वी मृत्यू झाल्याचे सांगितले.

या घटनेची माहिती मिळताच मंद्रुपचे पोलीस निरीक्षक शंकर पटवारी हे ग्रामीण रुग्णालय आले. पोलिसांनी पंचनामा केल्यानंतर डॉक्टरांनी दोघांचे शवविच्छेदन केले. रात्री उशिरा दोन्ही मुलांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात नाईकनगर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेची शिवाजी बाळासाहेब चव्हाण, रा नाईकनगर तांडा मंद्रुप यांनी पोलीसात खबर दिली आहे.

# वारंवार बिघाडामुळे माथेरानचा पाणीपुरवठा कोलमडला कायमस्वरूपी उपाय योजनेची मागणी तीव्र



कुंभे, जुंमा पट्टी आणि वॉटर पाईप येथील पंपिंग हाऊसमध्ये अतिरिक्त पंप उपलब्ध करून ठेवण्यात आले आहेत. एखादा पंप बंद पडल्यास पर्यायी पंपाद्वारे पाणीपुरवठा सुरू ठेवता येईल.

**- चंद्रकांत चौधरी (नगराध्यक्ष, माथेरान)**

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.१८, माथेरान :** माथेरानमध्ये यंदाच्या उन्हाळ्यात पाण्याच्या गंभीर समस्येने नागरिकांचे हाल होत असून जीवन प्राधिकरणाच्या कारभारावर स्थानिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. वारंवार होणारे तांत्रिक बिघाड, बंद पडणारी पंपिंग यंत्रणा आणि फुटणाऱ्या जलवाहिन्यांमुळे शहराचा पाणीपुरवठा सतत विस्कळीत होत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

जुंमा पट्टी, वॉटर पाईप आणि कुंभे येथील पंपिंग हाऊसमध्ये सातत्याने अडचणी निर्माण होत असल्याने माथेरानकरांना नियमित पाणी मिळणे कठीण झाले होते. काही वेळा पंपिंग बंद राहिल्याने शारलोट तलावावर अतिरिक्त ताण आला. त्यामुळे तलावातील पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात घटली असून तलावात साचलेल्या गाळामुळे परिस्थिती आणखी गंभीर बनली आहे.

स्थानिकांच्या मते, तलावात सुमारे १० ते १५ फूट गाळ साचलेला असून त्याची साफसफाई अद्याप झालेली नाही.याचदरम्यान, पावसाळ्यात नेरळ हून पाणीपुरवठा बंद असतानाही नागरिकांना वाढीव पाणीबिलेआकारली जात असल्याने ग्राहकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी मागील काही दिवसांत तिन्ही पंपिंग केंद्रांवर भेटी देत परिस्थितीचा आढावा घेतला होता. संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना तातडीने तांत्रिक त्रुटी दूर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यामुळे काही प्रमाणात पाणीपुरवठा सुरळीत झाला होता.

मात्र, कुंभे परिसरात मुख्य जलवाहिनी सुमारे सहा फूट खोलवर फुटल्याने पुन्हा एकदा माथेरानचा पाणीपुरवठा ठप्प झाला.

या घटनेनंतर नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी आणि मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची माहिती घेतली. तत्काळ दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आली असून आता पाणीपुरवठा पूर्ववत होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, तात्पुरत्या दुरुस्त्यांऐवजी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात याव्यात, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे. पर्यायी जलस्रोत, आधुनिक पंपिंग यंत्रणा आणि शारलोट तलावातील गाळ काढण्याची कामे तातडीने हाती घ्यावीत, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

## जांभुळनगर येथील विवाहित महिला ३ वर्षांच्या मुलासह नापत्ता



**अक्षराज : उमेश तबीब**

**दि.१८, दापोली (रत्नागिरी) :** मंडणगड तालुक्यातील अक्षता पवार वय २१ राहणार जांभुळनगर पालवणी ही विवाहित महिला तिचा मुलगा स्वराज पवार वय ३ वर्षे यांच्यासह नापत्ता झालेली असल्याची फिर्याद महिलेचा पती अक्षय पवार वय २३ वर्षे राहणार जांभुळनगर याने मंडणगड पोलीस स्थानकात दिनांक १६ मे २०२६ रोजी नोंदवली आहे. या फिर्यादीतील माहीतीनुसार १५ मे २०२६ रोजी नापत्ता विवाहीत महिलेने तिच्या मुलाला कडेवर बसवून गावातील अप्पा मपारा यांचे दुकानात साबण आणण्याकरिता जात आहे असे सासुला सांगुन दुकानाचे दिशेने निघून गेली यानंतर गावातून कुठुनतरी निघून गेली ती घरी परत न आल्याने तिचा पती, भाऊ व नातेवाईक यांनी तिचा व तिच्या मुलचा आजुबाजूस परिसरात नातेवाईक मित्र परिवार यांच्याकडे शोध घेतला असता नापत्ता महिला व तिचा लहान मुलगा सापडून आले नाहीत. त्यामुळे नापत्ता महिलेच्या पतीने पोलीस ठाणे मंडणगड येथे ती नापत्ता झालेली असल्याची फिर्याद नोंदवली पोलीस हवालदार सुनील मांडवकर या संदर्भात अधिक तपास करीत आहेत.

# गरीबीवर मात करत ओजस्वीची दैदिप्यमान झेप; ९४.६० टक्के गुणांनी परिसराचा उंचावली मान

## खापरखेडा पत्रकार संघ व प्रतिष्ठित नागरिकांकडून जिद्दीच्या लेकीचा प्रेरणादायी सत्कार



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१८, नागपूर :** आर्थिक परिस्थिती कितीही कठीण असली तरी जिद्द, मेहनत आणि शिक्षणाची ओढ असेल तर यश मिळविणे अशक्य नसते, हे खापरखेडा येथील ओजस्वी नंदु ताजणे हिने सिद्ध करून दाखविले आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत ओजस्वीने दहावी परीक्षेत तब्बल ९४.६० टक्के गुण मिळवत परिसराचा मान उंचावला. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल खापरखेडा पत्रकार संघ व परिसरातील प्रतिष्ठित नागरिकांच्या वतीने चमरी सभागृहात प्रेरणादायी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमाने केवळ एका विद्यार्थिनीचा गौरव झाला नाही, तर संघर्ष करणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना नवी प्रेरणा व मनोबल मिळाले. समाजाने एकत्र येत गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहण्याचा दिलेला संदेश सर्वांसाठी कौतुकास्पद ठरला. ओजस्वीच्या वडिलांचे मर्यादित उत्पन्न, घरची आर्थिक अडचण आणि अनेक संकटे असूनही त्यांनी मुलीच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. वडिलांची मेहनत आणि मुलीची जिद्द यांची सांगड घालत ओजस्वीने दहावीत घवघवीत यश संपादन केले.ओजस्वीच्या अभ्यासू वृत्तीने प्रभावित झालेल्या परिसरातील प्रतिष्ठित नागरिक प्रकाश राऊत यांनी तिच्या पुढील शिक्षणासाठी समाजातून आर्थिक मदत उभी करण्याची संकल्पना मांडली.या उपक्रमाला प्रतिष्ठित नागरिक व खापरखेडा पत्रकार संघाने उत्स्फूर्त प्रतिसाद देत अल्पावधीत वर्गणी जमा केली. कार्यक्रमात ओजस्वीचा शाल, पुष्पगुच्छ, संविधान पुस्तक व आर्थिक मदत देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार संघाचे मार्गदर्शक दिवाकर घेर, रोहणा ग्रामपंचायत सरपंच चंद्रशेखर लांडे, आनंद ट्युशन क्लासेसचे संचालक मनीष झोलदेव, पत्रकार संघाचे सचिव अभय मिश्रा, उपाध्यक्ष राजेश खंडारे, सहसचिव मयुर तिरपुडे, मार्गदर्शक केशव पानतावणे, कोषाध्यक्ष गिरधारी शर्मा, भाजप नेते बळी गायकवाड, शहराध्यक्ष राम डाखरे उपस्थित होते.

प्रमुख पाहुण्यांनी ओजस्वीच्या जिद्दीचे कौतुक करत अशा विद्यार्थ्यांना योग्य वेळी प्रोत्साहन आणि आधार मिळाला तर ते निश्चितच मोठे यश संपादन करू शकतात, असा विश्वास व्यक्त केला.यावेळी शाबीर भाई, भीम राव पाटील, हरीदास बागडे, विष्णुजी निखाडे, चिदुंजी नाकाडे, मोरेश्वर गिरे, स्वप्नील खांडेकर, प्रकाश राऊत, कृष्णा घोडेश्वार, ओजस्वीचा संपूर्ण परिवार,खापरखेडा पत्रकार संघाचे सदस्य व परिसरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन अभय मिश्रा तसेच आभार राजेश खंडारे यांनी मानले.

## छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात अत्याधुनिक २ 'मॅग्लुमी' रक्त तपासणी मशीनचे लोकार्पण




**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१७, कळवा (ठाणे) :** सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने डॉ.श्रीकांत शिंदे फाऊंडेशन आणि गोपाळराव पाटील शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या वतीने कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाला अत्याधुनिक अशा दोन मॅग्लुमी ८०० व 'मॅग्लुमी' २००० सीएलआयए विश्लेषक' मशीन सीएसआर उपक्रमांतर्गत प्रदान करण्यात आल्या असून त्याचे लोकार्पण आज ठाणे मनपा सभागृह नेते हणमंत जगदाळे यांच्या हस्ते झाले. या मशीनमुळे रुग्णालयातील रक्त निदान क्षमता अधिक वेगवान आणि परिणामकारक होणार असून हजारो रुग्णांना त्याचा थेट लाभ मिळणार आहे. यावेळी शिवसेना कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, नगरसेवक मिलिंद पाटील, नगरसेविका मनाली पाटील, नगरसेवक गणेश कांबळे, नगरसेवक योगेश जानकर, नगरसेविका चंद्रकांता साळवी, शाखाप्रमुख रवींद्र पाटील, समाजसेवक जगदीश भोईर, किशोर भोईर, मिलिंद सिन्नरकर, राधे वराडकर, निनाद बोराडे, रोहन शिंदे, नगरसेवक सचिन म्हात्रे आदी उपस्थित होते.

'मॅग्लुमी' ८०० आणि 'मॅग्लुमी' २००० या दोन्ही मशीन पूर्णपणे स्वयंचलित (फुली ऑटोमेटिक) असून त्यांची तपासणी क्षमता अत्यंत वेगवान आहे. एका तासात सुमारे २०० चाचण्या करण्याची क्षमता या मशीनमध्ये आहे. तसेच एकाच वेळी ४० रुग्णांचे नमुने तपासता येणार आहेत. कर्करोग, थायरॉईड, ट्युमर यांसारख्या गंभीर आजारांच्या चाचण्या अधिक अचूक आणि जलद पद्धतीने करता येणार असल्याने रुग्णांच्या उपचार प्रक्रियेला मोठी मदत होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील रुग्ण मोठ्या प्रमाणावर उपचारासाठी येत असतात. हे रुग्णालय सर्व सुविधांनी परिपूर्ण असावे, अशी भूमिका राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची असल्याचे यावेळी सभागृह नेते हणमंत जगदाळे यांनी सांगितले. डॉ.श्रीकांत शिंदे फाऊंडेशन आणि गोपाळराव पाटील शिक्षण प्रसारक मंडळ यांनी दिलेल्या या दोन मशीनमुळे रुग्णालयाची सेवा अधिक सक्षम होईल. मात्र मशीन सातत्याने कार्यरत ठेवण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध व्हावे यासाठी आयुक्तांशी चर्चा करण्यात येईल, जेणेकरून नागरिकांना या सुविधेचा पूर्ण लाभ मिळू शकेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. या मशीनमुळे ठाणे महापालिका रुग्णालयाच्या आरोग्य सेवेत आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल पडले असून सर्व स्तरांतून या उपक्रमाचे स्वागत होत आहे.

# राजुरा ते भुरकुंडा बूज बससेवा सुरळीत सुरू करावी - ॲड.चटप यांचे एस.टी. विभागाला निवेदन


ॲड. वामनराव चटप

दिनांक : 18/05/26

प्रति,

मा. आगार व्यवस्थापक साहेब

रा.म.प. महामंडळ राजुरा आगार

तह. राजुरा, जि.चंद्रपूर

महोदय,

**अक्षराज : चंद्रकांत भोयर**

**दि.१८, राजुरा (चंद्रपूर) :** राजुरा ते भुरकुंडा बूज ही बससेवा अनेक दशकांपासून ग्रामस्थांच्या दैनंदिन प्रवासाची महत्त्वाची जीवनवाहिनी म्हणून कार्यरत होती. काही तांत्रिक कारणांमुळे ही सेवा बंद असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. विद्यार्थ्यांपासून ते कामगार, महिला व ज्येष्ठ नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

सदर परिस्थितीचा गंभीर विचार करून माजी आमदार ॲड. वामनराव चटप यांनी एस.टी. विभागाकडे बससेवा तातडीने सुरू करण्याचे निवेदन सादर केले.

यावेळी दिलीप देठे, उपसरपंच भुरकुंडा बूज, तसेच सौरभ मादासवार यांनीही चटप यांना सूचित करून आमच्या गावाची बससेवा त्वरित सुरळीत सुरू व्हावी, अशी विनंती केली. त्यांच्या सूचनेवर सकारात्मक प्रतिसाद देत चटप यांनी संबंधित विभागाकडे पुढाकार घेतला.

चटप यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे की, ही बससेवा सुरू झाल्यास केवळ भुरकुंडा बूजच नव्हे, तर मार्गातील सर्व गावांतील नागरिकांना मोठा दिलासा मिळेल. शैक्षणिक, आरोग्य, रोजगार व दैनंदिन प्रवासासाठी ही सेवा अत्यंत महत्त्वाची आहे.

ग्रामस्थांनी चटप यांच्या हस्तक्षेपाचे स्वागत केले असून एस.टी. प्रशासनाने त्वरित कारवाई करून बससेवा पूर्ववत सुरू करावी, अशी सर्व स्तरांतून अपेक्षा व्यक्त होत आहे.